॥ कल्पवृक्ष कन्येसाठीं ॥

गयिकाः लता मंगेशकर
गीतः पी. सावळाराम
संगीतः वसंत प्रभू

कल्पवृक्ष कन्येसाठीं लावुनियां बाबा गेलां
वैभवानें बहरुन आला, याल का हो बघायाला ॥ धृ. ॥

तुम्ही गेलां आणिक तुमच्या, देवपण नांवा आलें
सप्तस्वर्गा चालत येतां, थोरपण तुमचें कळलें
गंगेकाठिं घर हें आपुलें, तीर्थक्षेत्र काशी झालें!
तुम्हावीण शोभा नाहीं, वैभवाच्या देऊळाला ॥ १ ॥

सूर्य चंद्र तुमचे डोळे, दुरूनीच हो बघतात
कमी नाहिं आम्हा कांहीं, कृपादृष्टीची बरसात
पाच बोतें अमृताचीं, पंचप्राण तुमचे त्यांत
पाठिवरी फिरवा हात, या हो बाबा एकच वेळां ॥ २ ॥